# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 12 February 2025

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १२ फेब्रुवारी २०२५ दुपारी १.०० वा.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी फ्रान्सच्या दौऱ्यावर असून, ते आज मार्सेलीस इथं पोहोचले. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात या ठिकाणाचं मोठं महत्व आहे. स्वातंत्र्यवीर सावरकर इथल्याच समुद्रकिनाऱ्याजवळ जहाजातून उडी मारुन मार्सेलीस बंदरावर पोहोचले होते. त्यावेळी त्यांना पाठिंबा देणाऱ्या आणि ब्रिटिशांच्या ताब्यात देण्याला विरोध करणाऱ्या फ्रेंच कार्यकर्त्यांचे आणि जनतेचे आपल्याला आभार मानायचे असल्याचं, पंतप्रधान मोदी यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युअल मॅक्रॉ यांच्या हस्ते मार्सेलीस इथं भारताच्या नव्या वाणिज्य दूतावासाचं उद्घाटनही करण्यात येणार आहे.

****

प्रयागराज इथल्या महाकुंभमेळ्यात आज माघ पोर्णिमा स्नान सुरु आहे. यावर्षी दहा लाखाहून अधिक कल्पवासी भाविक यामध्ये सहभागी होत आहेत. उत्तर प्रदेश सरकारनं विशेष वाहतूक व्यवस्थेसह कडक सुरक्षा व्यवस्था तयार केली आहे. १३ जानेवारी रोजी महाकुंभमेळ्याला सुरुवात झाल्यापासून आतापर्यंत ४६ कोटींहून अधिक भाविकांनी त्रिवेणी संगमावर पवित्र स्नान केल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

आज देशभरात संत रविदास यांची जयंती साजरी केली जात आहे. रविदास महाराज यांच्या जयंतीनिमित्त वाशिम इथल्या बस स्थानक परिसरात सकल चर्मकार समाज बांधवांच्या वतीने आज स्वच्छता मोहिम राबवण्यात आली. यावेळी सर्वप्रथम वाशिम बस आगाराचे व्यवस्थापक अनिरुद्ध मेहत्रे आणि माजी आमदार पुरुषोत्तम राजगुरू यांनी संत रोहिदास महाराज यांच्या प्रतिमेचं पूजन केलं. यावेळी मोठ्या संख्येने समाज बांधवांची उपस्थिती होती.

****

थोर समाज सुधारक दयानंद सरस्वती यांचीही आज जयंती आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी त्यांना आदरांजली वाहिली असून, स्वामी दयानंद सरस्वती यांनी लोकांना सामाजिक कुरीतींबाबत जागरूक करत, स्वराज्य, स्वधर्म आणि स्वदेशी भावना लोकांमध्ये जागवल्या, असं म्हटलं आहे.

****

लोकप्रिय समाजमाध्यम असलेल्या इन्स्टाग्रामवर आता किशोरवयीन मुलांच्या सुरक्षेसाठीचे अधिक पर्याय उपलब्ध करून देण्यात येणार आहेत, अशी घोषणा मेटा या कंपनीने केली आहे. अनावश्यक मेसेजेस रोखणं, गोपनीयता राखण्यासाठी अधिक पर्याय, पालकांना अकाउंटवर देखरेख करण्याची सुविधा यांचा यात समावेश असेल. १६ वर्षं वयापेक्षा कमी असलेल्या युजर्सचा वावर अधिक सुरक्षित करण्याकडे मेटाचं प्राधान्य असेल. अशा युजर्सच्या अकाउंटवर पालकांना नियंत्रण ठेवता येईल, तसंच ॲपच्या वापराचा वेळही पालकांना निश्चित करता येणार आहे.

****

राज्यातल्या शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयात तासिका तत्वावरच्या अधिव्याख्यात्यांचं मानधन वेळेवर देण्याचे निर्देश, उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिले आहेत. मंत्रालयात आयोजित बैठकीत ते बोलत होते. तासिका तत्वावर असणाऱ्या अधिव्याख्यात्यांना दरमहा मानधन मिळेल असं नियोजन करावं असं त्यांनी म्हटलं.

****

राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्याविरोधात समाज माध्यमातून आक्षेपार्ह पोस्ट केल्याप्रकरणी दोन आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे. या दोघांना आज गिरगाव इथल्या मेट्रोपॉलिटन कोर्टात हजर करण्यात येणार आहे. या पूर्वी या प्रकरणात एकूण नऊ आरोपींना चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आलं असून, अधिक तपास सुरू आहे.

****

मुंबई शेअर बाजारात आज सलग सहाव्या दिवशीही घसरण सुरु आहे. सकाळच्या सत्रात सेन्सेक्स ७५० अंकांनी घसरला होता, तर सुरुवातीच्या व्यवहारात निफ्टी २३,००० अंकांच्या खाली घसरल्याचे पाहायला मिळाले. दरम्यान, गेल्या पाच ट्रेडिंग सत्रांमध्ये बीएसई सेन्सेक्स २,२९० अंकांनी तर निफ्टी ६६७.४५ अंकांनी घसरला आहे.

****

नागपूर सिकंदराबाद या वीस डब्यांच्या वंदे भारत एक्सप्रेसचे डबे कमी करण्यात येणार असून येत्या एकोणीस तारखेपासून या गाडीला आठ डबे असतील. ही गाडी दिवसा प्रवास करत असल्यामुळे नागरिकांचा प्रतिसाद कमी मिळत असल्याचं दिसून आल्यानंतर मध्य रेल्वेनं हा निर्णय घेतला आहे.

****

भारत आणि इंग्लंड संघात तिसरा आणि अंतिम एकदिवसीय क्रिकेट सामना आज अहमदाबाद इथं खेळवण्यात येणार आहे. दुपारी दीड वाजता सामन्याला सुरुवात होईल. मालिकेत पहिले दोनही सामने जिंकून भारताने विजयी आघाडी घेतली आहे.

दरम्यान, क्रिकेटपटू जसप्रीत बुमराह पाठीच्या दुखापतीमुळे आयसीसी चॅम्पियन्स चषक स्पर्धा खेळू शकणार नाही. त्याच्या जागी हर्षित राणाचा समावेश करण्यात आल्याचं भारतीय क्रिकेट नियामक मंडळानं सांगितलं.

****

चीनमध्ये सुरू असलेल्या आशिया मिश्र सांघिक बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेत भारतानं मकाउ वर पाच-शून्य असा दणदणीत विजय मिळवत आपलं उपान्त्यपूर्व फेरीतलं स्थान पक्कं केलं आहे. आज झालेल्या फेरीत भारताच्या सतीशकुमार करुणाकरन आणि आद्या वरियथ या जोडीनं मिश्र दुहेरीत, ट्रीसा जॉली आणि गायत्री गोपीचंद या जोडीनं महिला दुहेरीत, एम आर अर्जुन आणि चिराग शेट्टी या जोडीनं पुरुष दुहेरीत, तर लक्ष्य सेननं पुरुष एकेरीत आणि मालविका बनसोडनं महिला एकेरीत आपापल्या प्रतिस्पर्ध्यांवर मात केली.

****